**मे. जिल्हा खनिकर्म अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद, महाराष्ट्र यांनी प्रस्तावित केलेल्या औरंगाबाद जिल्हयातील फुलंब्री (वडोद खुर्द व शेवता खुर्द, निमखेडा), पैठण (नांदर भाग-१, नांदर भाग-२, नांदर भाग-३, नवगांव भाग-२, ब्रम्हगांव), सिल्लोड (कोटनांद्रा, बोरंगाव कासारी, सावखेडा बुद्रुक धानोरा), वैजापुर (मांडकी, झोलेगाव, नागमठाण, लाखनी, पुरणगांव, भालगांव, लासुरगांव, आवलगांव, वांजरगांव) आणि कन्नड (देवळी) या तालुक्यातील प्रस्तावित २२ वाळू पट्टयांच्या संदर्भात दि. ३०/११/२०२२ रोजी सकाळी ११.०० वा. जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद, जि. महाराष्ट्र येथे घेण्यात आलेल्या पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणीचे इतिवृत्त.**

---

मे. जिल्हा खनिकर्म अधकिारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद, महाराष्ट्र यांनी प्रस्तावित केलेल्या औरंगाबाद जिल्हयातील फुलंब्री (वडोद खुर्द व शेवता खुर्द, निमखेडा), पैठण (नांद भाग-१, नांदर भाग-२, नांदर भाग-३, नवगांव भाग-२, ब्रम्हगांव), सिल्लोड (कोटनांद्रा, बोरगांव कासारी, सावखेडा बुद्रूक, धानोरा), वैजापूर (मांडकी, झोलेगांव, नागमठाण, लखनी, पुरणगांव, भालगांव, लासुरगांव, आवलगांव, वांजरगांव) आणि कन्नड (देवळी) या तालुक्यातील प्रस्तावित २१ वाळू पट्टयांच्या संदर्भात दि. ३०/११/२०२२ रोजी सकाळी ११.०० वा. जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद, जि. ओरंगाबाद, महाराष्ट्र येथे पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी घेण्यात आली होती.

जाहीर लोक सुनावणीस खालील समिती सदस्य उपस्थित होते :

१. डॉ. अनंत गव्हाणे,
अतिरिक्त जिल्हाधिकारी, औरंगाबाद,
जि. औरंगाबाद — अध्यक्ष

२. श्री. सुशिलकुमार राठोड,
उप-प्रादेशिक अधिकारी,
म.प्र.नि.मंडळ, औरंगाबाद. — समन्वयक

जाहीर लोक सुनावणीस उपस्थित असलेले सदस्य आणि सार्वजनिक सहभागी यांची यादी येथे जोडली आहे. श्री. सुशिलकुमार राठोड, उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, औरंगाबाद तथा पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी समितीचे समन्वयक यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत केले आणि अतिरिक्त जिल्हाधिकारी, औरंगाबाद तथा सदर पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी समितीचे अध्यक्ष यांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणीचे कामकाज सुरु केले. त्यांनी औरंगाबाद जिल्हयातील फुलंब्री (वडोद खुर्द व शेवता खुर्द, निमखेडा), पैठण (नांदर भाग-२, नांदर भाग-२, नांदर भाग-३, नवगांव भाग-२, ब्रम्हगांव), सिल्लोड (कोटनांद्रा, बोरगांव व कासारी, सावखेडा बुद्रूक, धानोरा), वैजापूर (मांडकी, झोलेगांव, नागमठाण, लाखणी, पुरणगांव, भालगांव, लासुरगांव, आवलगांव, वांजरगांव) आणि कन्नड (देवळी) या तालुक्यातील प्रस्तावित २१ वाळु पट्टयांच्या प्रस्तावित संदर्भात पर्यावरण विषयक जाहीर लोक

सुनावणीच्या उद्देशां विषयी विषद केले आणि सांगितले की पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, अधिसुचना क्र. एस.आ. १५३३ दि. १४ सप्टेंबर, २००६ आणि सुधारीत अधिसुचना क्र. एस.ओ. ३०६७ (इ), दि. ०१/१२/२००९ नुसार वाळू पट्टयांच्या प्रस्तावासाठी पर्यावरण व हवामान बदल विभाग, महाराष्ट्र यांची पर्यावरण विषयक अनुमती घेणे आवश्यक आहे आणि त्याचाच एक भाग म्हणुन सदर प्रकल्पासाठी पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी घेणे बंधनकारक आहे.

त्यांनी सांगितले की औरंगाबाद जिल्हयातील पाच तालुक्या मधील प्रस्तावित २१ वाळू पट्टयांच्या/घाटांच्या प्रस्तावा बाबत पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनाणी घेण्यासाठी नियमानुसार/रितसर अर्ज महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे दि. २५ ऑक्टोंबर, २०२२ रोजी प्राप्त झाला, त्या अनुषंगाने जाहीर सुचना दि. ३० ऑक्टांबर, २०२२ रोजीच्या दैनिक सकाळ (मराठी) आणि दैनिक द टाईम्स ऑफ इंडिया (इंग्रजी) या वर्तमानपत्रां मध्ये प्रकाशीत करण्यात आली होती, आणि आजची पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी दि. ३० नोव्हेंबर, २०२२ रोजी सकाळी ११.०० वा. जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद येथे आयोजित करण्यात आलेली आहे. तसचे सदर प्रकल्पाच्या पर्यावरण आघात मुल्यांकन अभ्यास अहवाल/पर्यावरण व्यवस्थापन योजनाच्या प्रती औरंगाबाद जिल्हयातील विविध तालुक्यामधील परिसरातील संबंधीत २१ ग्रामपंचायत कार्यालये जसे, फुलंब्री तालुक्यातील वडोद खुर्द, शेवता खुर्द, निमखेडा पैठण तालुक्यातील नांदर भाग-१, नांदर भाग-२, नांदर भाग-२, नांदर भाग-३, नवगांव भाग-२, ब्रम्हगांव, सिल्लोड तालुक्यातील कोटनांद्रा, बोरगांव कासारी, सावखेडा बुद्रूक, धानोरा, वैजापूर तालुक्यातील मांडकी, झोलेगांव, नागमठाण लाखनी, पुरणगांव, भालगांव, लासुरगांव, आवलगांव, वांजरगांव आणि कन्नड तालुक्यातील देवळी ग्रामपंचायत कार्यालय, त्याच प्रमाणे इतर शासकीय कार्यालये जसे, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद, जिल्हा खनिकर्म अधिकारी, औरंगाबाद, जिल्हा उद्योग केंद्र, औरंगाबाद, जिल्हा परिषद कार्यालय, औरंगाबाद, तहसिलदार, तहसिल कार्यालय, फुलंब्री, पैठण, सिल्लोड, वैजापुर आणि कन्नड, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, फुलंब्री, पैठण, सिल्लोड, वैजापुर आणि कन्नड, प्रादेशिक कार्यालय आणि उप-प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, औरंगाबाद, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ (मुख्यालय), सायन मुंबई, पर्यावरण विभाग मंत्रालय, मुंबई आणि प्रादेशिक कार्यालय, पर्यावरण वने व हवामान बदल मंत्रालय, नागपुर या ठिकाणी नागरिकांच्या अभ्यासासाठी ठेवण्यात आलेल्या होत्या आणि सदर प्रकल्पा संबंधी नागरिकांस त्यांच्या पर्यावरण विषयक सुचना, विचार, टिपणी, तसेच आक्षेप इ. जाहीरात प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत उप-प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ, औरंगाबाद येथे नोंदवाव्यात अशी विनंती करण्यात आलेली होती, त्या अनुषंगाने उप-प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ, औरंगाबाद येथे उपरोक्त प्रस्तावित प्रकल्पासंबंधी आजपर्यंत एकही सुचना/आक्षेप/तक्रार प्राप्त झालेली नाही. त्यांनी सार्वजनिक सहभागींना विनती केली की सदर प्रकल्पा बाबत जर कुणाला काही पर्यावरणीय सुचना, विचार टिपणी, आक्षेप इ. व्यक्त करावयाचे असतील तर ते आजच्या जाहीर लोक सुनावणी दरम्यान येथे सुध्दा मौखिक अथवा लिखीत स्वरुपात नोंदविल्या जाउ शकेल आणि फक्त पर्यावरणाशी संबंधितच प्रश्न विचारावेत जेणेकरुन प्रकल्प प्रवर्तकातर्फे त्यावर योग्य मार्गदर्शन आणि शंका समाधान झाल्यानंतर त्याची नोंद केल्या जाईल व सदर बाबीची इतिवृत्तामध्ये नोंद केली जाईल, तसेच सदर जाहीर लोकसुनावणीची व्हिडीओ रेकॉर्डींग करण्यात येत असुन ती जशीच्या तशी

पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर करण्यात येईल आणि त्यानंतर त्यांनी पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी समितीचे अध्यक्ष यांच्या परवानगीने प्रकल्प प्रवर्तकास प्रस्तावित प्रकल्पा संबंधिचे विस्तृत सादरीकरण सुरु करावे, अशी विनंती केली.

त्यानंतर श्री. आशिष शुक्ला, प्रकल्प सल्लागार (पर्यावरण सल्लागार, मे. एन्व्हायरो टेक्नो कंसल्टंट प्रायव्हेट लिमीटेड, नागपूर) यांनी प्रकल्प प्रवर्तक मे. जिल्हा खनिकर्म अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांच्या वतीने प्रस्तावित प्रकल्पाचे पावर पॉईंट सादरीकरण ज्यामध्ये प्रकल्पाचा तपशिल, पर्यावरणीय प्रदूषण योजना, साधने, करण्यात येणा-या उपाय योजना यांचा समावेश आहे ते सुरु केले आणि प्रस्तावित २१ वाळू पट्टयांचाा/घाटांचा तपशिल खालील प्रमाणे विषद केला :

| अ.क्र. | तालुक्याचे नाव | गावाचे नाव | नदीचे नाव | उपलब्ध्द वाळू (ब्रास मध्ये) |
|---|---|---|---|---|
| १ | फुलंब्री | वडोद खुर्द व शेवता खुर्द | गिरजा | ७०६७ |
| २ | फुलंब्री | निमखेडा | गिरजा | ९४४१ |
| ३ | पैठण | नांदर भाग-१ | विरभद्रा | ३९७५ |
| ४ | पैठण | नांदर भाग-२ | विरभद्रा | ३८१६ |
| ५ | पैठण | नांदर भाग-३ | विरभद्रा | ३७१० |
| ६ | पैठण | नवगांव भाग-२ | विरभद्रा | ८०३८ |
| ७ | पैठण | ब्रम्हगांव | विरभद्रा | ४०५३ |
| ८ | सिल्लोड | कोटनांद्रा | पुर्णा | ५८३० |
| ९ | सिल्लोड | बोरगांव कासारी | पुर्णा | ३५३४ |
| १० | सिल्लोड | सावखेडा बुद्रूक | पुर्णा | १८३७ |
| ११ | सिल्लोड | धानोरा | पुर्णा | ५०८८ |
| १२ | वैजापुर | मांडकी | शिवना | ४४१७ |
| १३ | वैजापुर | झोलेगांव | शिवना | ३९९५ |
| १४ | वैजापुर | नागमठाण | गोदावरी | १२३२६ |
| १५ | वैजापुर | लाखनी | शिवना | ५१९४ |
| १६ | वैजापुर | पुरणगांव | गोदावरी | १०६०० |
| १७ | वैजापुर | भालगांव | गोदावरी | ३७१० |
| १८ | वैजापुर | लासुरगांव | शिवना | ३७१० |
| १९ | वैजापुर | आवलगांव | गोदावरी | ३९९८ |
| २० | वैजापुर | वांजरगांव | गोदावरी | १२३६७ |
| २१ | कन्नड | देवळी | शिवना | ३६५७ |

त्यांनी सांगितले की जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांनी वाळू उत्खनन मार्गदर्शक तत्वे (वाळू निर्गमितीचे धोरण) दि. ०३/०९/२०१९ व दि. २८/०१/२०२२ अनुसार २१ वाळू घाट उत्खननासाठी प्रस्तावित

केलेले आहेत आणि जिल्हा खनिकर्म अधिकारी, औरंगाबाद यांना विविध अनुमती घेणे करिता प्रकल्प प्रवर्तक म्हणुन नेमलेले आहे. सदर २१ वाळू घाटांचे उत्खनन ओपन कास्ट पध्दतीने घमेले, फावडे यांच्या सहाय्ययाने तहसिलदार यांच्या अध्यक्षते खालील तालुका तांत्रिक समितीद्वारे तालुका स्तरावरप्रस्तावित केलेले आहे. त्यांनी पुढे सांगितले की सदर वाळू घाटांकरिता लागणा-या परवानग्यासाठी जिल्हा खनिकर्म अधिकारी, औरंगाबाद यांनी प्रकल्प प्रवर्तक म्हणून नियुक्ती केलेली आहे, प्रकल्प नविन आहे, वाळू घाटासाठी प्रस्तावित आहे आणि उत्खननाचे खनिज वाळू आहे, त्यासाठी तहसिलदार यांच्या अध्यक्षते खालील समितीमध्ये महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, भु वैज्ञानिक, जलसंधारण विभागांचे प्रतिनिधी यांचा समावेश आहे, वाळू उत्खनन मार्गदर्शक तत्वानुसार सर्व वाळू घाटांसाठी ग्रामपंचायतींच्या परवानग्या मिळालेल्या आहेत, १० जुन ते ३० सप्टेंबर हा पावसाळयाचा कालावधी वगळून वाळू घाट लिलाव आणि वाळू उत्खननासाठी जास्तीत जास्त एक वर्षाच्या कालावधी करिता उपलब्ध्द असेल, भु विज्ञान आणि खनिकर्म संचालनालय, नागपुर क्षेर पत्र क्र. एसटीसी/४४६/२०२०-२१/४१७२ दि. १० नोव्हेंबर, २०२२ अनुसार खाणकाम आराखडा मंजुर करण्यात आलेला आहे, जिल्हा सर्वेक्षण अहवाल प्रारुप-१ जिल्हा संकेत स्थळावर दि. ०७ ऑक्टोंबर, २०२१ रोजी प्रसिध्द करण्यात आला व प्रसिध्दी सुचना दैनिक लोकमत या वर्तमानपत्रात दि. ८ ऑक्टोंबर, २०२१ ला प्रकाशित झालेली आहे, तसेच जिल्हा सर्वेक्षण अहवाल (प्रारुप-रेती दुरुस्ती २०२२-२३) दि. ०१/११/२०२२ ला सुचना, आक्षेप नोंदविण्याकरिता पुन: प्रकाशित करण्यात आलेला आहे, आणि प्रस्तावित २१ वाळू घाटांसाठी परवानग्या प्राप्त झालेल्या आहेत, पर्यावरणीय अनुमतीसाठी पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी आयोजित केलेली आहे.

त्यांनी प्रस्तावित उत्खनन पध्दती विषयी विषद केले आणि सांगितले की वाळू उत्खनन हाताने टोपले, फावडे यांच्या द्वारे मजुरांच्या सहाय्याने करण्याचे प्रस्तावित आहे, मातीचे उत्खनन केले जाणार नाही. उचललेल्या वाळूची वाहतुक ट्रॅक्टर द्वारे प्रस्तावित आहे, ट्रॅक्टर वगळता कोणतेही अवजड आणि यांत्रिक यंत्रसामुग्री वापरले जाणार नाही, वाळू उचलणे व वाळू वाहतुकी दरम्यान एकही झाड तोडण्याचे प्रस्तावित नाही, माननीय राष्ट्रीय हरित लवादाच्या निर्णयानुसार कोणताही वाळू घाट नदी प्रतिबंधित क्षेत्रात प्रस्तावित नाही, क्षमतेपेक्षा जास्त वाळू वाहतुक टाळण्यासाठी ट्रॅक्टर ट्रॉलीवर रंगित पट्टे रंगविले जातील आणि वाळू वाहतुक करणा-या ट्रॅक्टर ट्रॉलीला विशिष्ट रंग देण्याचे प्रस्तावित केल्या जाउ शकते. प्रकल्पा अंतर्गत एक ब्रास क्षमतेचे ट्रॅक्टर आणि रस्त्यावर पाणी शिंपडण्यासाठी ग्रेडर/ट्रक प्रती घाट ही यंत्रसामग्री प्रस्तावित आहे.

त्यांनी प्रस्तावित पर्यावरण व्यवस्थापन योजने विषयी विषद केले आणि खालील प्रमाणे सांगितले :

**वायु प्रदूषण** : वाहन रस्ता/वाळू वाहतुक मार्ग, ट्रक/ट्रॅक्टर यांची हालचाल (वर्दळ), वाळू घाट व वाळू घाट मार्ग आणि नदी किनारा व्यवस्थापन हे वायु प्रदूषणाचे स्त्रोत आहेत.

**वाहन रस्ता/वाळु वाहतुक मार्ग** : वाहन रस्ता/वाळू वाहतुक मार्गापुढे हवा गुणवत्ता/जमिन/रस्ता मजबुती रस्त्याचा -हास यावर अपेक्षित परिणाम आहे आणि त्यासाठी करण्यात येणा-या उपाय योजना वाहन मार्गाचे मजबुतीकरण व देखरेख, ट्रॅक्टर मध्ये परवानगी योग्य क्षमतेनुसार खनिज वाहतुक आणि उत्खनन कालावधी दरम्यान हवा गुणवत्ता तपासणे या आहेत.

**ट्रक/ट्रॅक्टरची हालचाल :** ट्रक/ट्रॅक्टरच्या हालचालीमुळे हवा गुणवत्तेवर अपेक्षति परिणाम आहे व त्यासाठी करण्यात येणा-या उपाययोजना ट्रॅक्टरमध्ये परवानगी योग्य क्षमतेपेक्षा जास्त खनिज न भरणे, वाहतुकी दरम्यान वाळू वाहतुक करणा-या ट्रॅक्टर ट्रॉलीला ताडपत्रीने झाकणे, वाहनास गती नियंत्रक बसविणे आणि वाळू घाटावर ट्रॅक्टर मध्ये वाळू भरताना इंजिन बंद ठेवणे या आहेत.

**वाळू घाट व वाळू घाट मार्ग :** वाळू घाट व वाळू घाट मार्गामुळे उत्खनन प्रक्रियेवर अपेक्षित परिणाम आहे आणि त्यासाठी वाळू घाट मार्गाची नियमीत दुरुस्ती व देखभाल, कामगारांना डस्ट मास्क देणे आणि उत्खनन व वाळू वाहतुक दिवसाच्या वेळी करणे हे नियंत्रण उपाय प्रस्तावित आहेत.

**नदी किनारा व्यवस्थापन :** नदी किना-यांची झिज व पुर रेषा व्यवस्थापनासाठी नदी किना-यावर झाडे लावणे आणि नदी किना-याच्या उतारावर हिरवळ/गवताची लागवड करणे असे नियंत्रण उपाय प्रस्तावित केले आहे.

**व्यवसायीक आरोग्य आणि सेवा योजना :** व्यवसायीक आरोग्य आणि सेवामुळे कामगारांची सुरक्षा आणि उत्खननावर अपेक्षित परिणाम आहे, त्याकरिता कामगारांसाठी पर्यावरण स्नेही (पुरक) व सुरक्षित वातावरण तयार करणे हे नियंत्रण उपाय प्रस्तावित आहेत, तसेच त्याच्या अंमलबजावणीसाठी मान्यताप्राप्त निविदाधारक/कंत्राटदारातर्फे उपाय केले जातील, कामगारांना वैयक्तीक संरक्षण उपकरणे तसेच प्रशिक्षण आणि प्रथमोपचार, पिण्यायोग्य पाणी व तात्पुरत्या निवा-याची सोय प्रदान करणे हे देखील प्रस्तावित आहे.

**ध्वनी प्रदूषण :** ध्वनी प्रदूषण नियंत्रणासाठी कामगारांना इयरमफ प्रदान करणे, ट्रॅक्टर/ट्रक व्यतिरीक्त कोणत्याही ध्वनी प्रदूषण करणा-या मशिनला प्रतिबंध घालणे, वाळू घाटावर वाळू भरताना ट्रॅक्टर इंजिन बंद ठेवणे, कामगारांसाठी आरोग्य तपासणी करणे आणि अभ्यांगतासाठी वैयक्तीक संरक्षण उपकरणे प्रदान करणे असे नियंत्रण उपाय प्रस्तावित केलेले आहेत.

**वाहतुक व्यवस्थापन :** वाहतुक व्यवस्थापनासाठी प्रस्तावित केलेले उपाय असे आहेत, खनिज वाहतुक करणारे वाहन वन व महसुल विभागाकडे नोंदणीकृत करणे आणि अशा प्रत्येक वाहनांकडे प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्र असणे बंधनकारक असेल, अशी सर्व वाहने ध्वनी उत्सर्जन/धुळ/इतर उत्सर्जन संबंधी मानकाद्वारे उच्च पातळीच्या देखभाली प्रमाणीत असतील, अशी सर्व वाहनचालक वाहतुकीचे नियमांचे पालन करतील आणी अशा सर्व वाहनांची गती नियंत्रित असेल, क्षमतेपेक्षा जास्त खनिज वाहतुक करता येणार नाही, खनिज वाहन करणा-या वाहनाचे खनिज ताडपत्रीने झाकणे आणि वाहतुकी अडथळा होउ नये म्हणुन इतर वाळू कंत्राटदारांशी समन्वय साधुन वाळू वाहतुक करणे.

**वृक्षारोपण योजना :** पावसाळयाच्या कालावधीत (१० जुन ते ३० सप्टेंबर) नदी किनारी आणि वाहन मार्गावर निम, पिंपळ, करंज, गुलमोहर, इ. अशी स्थानिक झाडे लावण्याचे प्रस्तावित आहे आणि मान्यता प्राप्त निविदा धारक/वाळू कंत्राटदार यांनी व्यवस्थापन अंदाजानुसार पर्यावरण व्यवस्थापन योजनेची अंमलबजावणी करणे देखील प्रस्तावित आहे. मान्यताप्राप्त निवीदा धारक/वाळू कंत्राटदार सदर पर्यावरण व्यवस्थापन योजना अंमलबजावणीचा अनुपालन अहवाल जिल्हा खनिकर्म अधिकारी, तत्सम तहसिलदार

यांना सादर करतील आणि जिल्हा खनिकर्म अधिकारी/तत्सम तहसिलदार हे पर्यावरण व्यवस्थापन योजनेच्या अंमलबजावणी संबंधी वेळोवेळी खात्री करतील आणि वाळू उत्खनन मार्गदर्शक तत्वानुसार सुचविल्या प्रमाणे जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षते खालील समितीला अहवाल सादर करतील.

त्यांनी प्रस्तावित हा वाळू घाटांची यादी आणि पर्यावरण व्यवस्थापन योजनेच्या अंदाजित खर्चाचा तपशिल दाखविला आणि सांगितले की अशा प्रकारे पर्यावरण व्यवस्थापन योजनेची अंमलबजावणी केली जाईल आणि नंतर सदर प्रकल्पाचे पावर पॉईंट सादरीकरण समाप्त केले.

त्यांनतर, डॉ. अनंत गव्हाणे, अतिरिक्त जिल्हाधिकारी, औरंगाबाद तथा पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी समितीचे अध्यक्ष यांनी सार्वजनिक सहभागींना विनंती केली की सदर प्रकल्पा बाबत जर कुणाचे काही प्रश्न, विचार, मत इ. असतील तर ते विचारु शकतात.

सार्वजनिक जाहीर लोकसुनावणी दरम्यान सार्वजनिक सहभागी आणि समिती सदस्य यांनी सदर प्रकल्पाशी संबंधीत काही प्रश्न विचारले व समिती सदस्य/प्रकल्प प्रवर्तक यांना त्यांचे उत्तर दिले ते खालीलप्रमाणे आहेत :

- **श्री. जे. जे. अहिरराव, ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत, देवगांव (रंगारी), ता. कन्नड, जि. औरंगाबाद** यांनी सांगितले वाळू उत्खननासाठी नियमानुसार ट्रॅक्टरचा उपयोग करण्यात आला पाहिजे, परंतु प्रत्यक्षात आपण पाहतो की त्यासाठी अवजड यंत्रांचा वापर केला जातो, तर मग ग्रामपंचायती तर्फे काय पावले उचलावीत असे त्यांनी विचारले, त्यावर डॉ. गव्हाणे यांनी सांगितले की ते त्यावेळेला संबंधीत तहसिलदार/जिल्हा प्रशासनाच्या निदर्शनास आणुन दयावे, आणि समजा कोणी जेसीबी वगैरे लावत असेल तर त्यासाठी परवानगी देउ नये. त्यांनी पुढे सांगितले की आणि आपल्या जिल्हयात २१ वाळू घाट प्रस्तावित आहेत, परंतु नदी पात्र प्रचंड मोठे आहेत ज्यामध्ये अनेक ठिकाणी वाळू घाट नाहीत तेथुन सुध्दा लोक वाळू चोरतात, म्हणुन त्यांना पकडण्याची जबाबदारी ग्रामपंचायतने घेतली पाहिजे. या संबंधीचे नियम येथे विषद करण्यात आलेले आहेत, आणि नियमानुसार काय केले पाहिजे, विशेषत: वाळू उत्खनन चालु असताना काही कामगार वाळू उत्खननाच्या भागात राहतात, व त्यांना काही सुविधा देणे अपेक्षित आहे, ते त्यांच्या उदर निर्वाहासाठी मजुर म्हणुन काम करतात, त्यांचे आरोग्य वगैरे चा प्रश्न आहे आणि त्यांना सुध्दा ती बाब (वाळू चोरी विषयी) सांगितली जाते. त्यांनी निदर्शनास आणुन दिलेली ग्राम दक्षता समिती सुध्दा आहे, जी चे अध्यक्ष सरपंच आहेत आणि सुचविले की सदर समितीची बैठक दर पंधरा दिवसातुन एकदा घ्यावयास पाहिजे, आणि जर अवैध वाळू उत्खनन आढळले आणि ज्या काही अटी येथे विषद केल्या त्या त्यांना समजावुन सांगितल्या (सरपंच/ग्रामपंचायत) पाहिजे, आणि या संबधी जर एखादी चुकीची बाब आढळली, तर त्याबाबतची माहिती संबधित तहसिलदार आणि जिल्हाधिकारी यांना लिखीत स्वरुपात दिली पाहिजे कारण त्याचे रेकॉर्ड ठेवले पाहिजे, समजा ग्रामपंचायत तहसिलदारांना जेसीबी देताना तोंडी सांगायला पाहिजे, आणि जर एखादी चुकीची गोष्ट केली, तर ती लपविली जाणार नाही आणि ती लगेच उघडी होते कारण आजकाल प्रत्येकाच्या मोबाईल फोन (भ्रमणध्वनी) मध्ये कॅमेरा असतो. श्री. अहिरराव यांनी जर नियमांचे पालन न करणा-या छायाचित्रण केले व ते तहसिलदारांना दाखविले तर तो अधिकृत पुरावा

म्हणुन विचारात घेतल्या जाईल काय (ग्राहय धरला जाईल काय) असे विचारले, डॉ. गव्हाणे यांनी सदर प्रश्न स्पष्ट करण्या विषयी विचारले, त्यावर श्री. जनार्दन काकडे, झोलेगांव, ता. वैजापुर, जि. औरंगाबाद येथील रहिवाशी यांनी तयार केलेला विडीयो अधिकृत पुरावा म्हणुन विचारात घेतला जाईल काय, असे विचारले, त्यावर डॉ. गव्हाणे यांनी सांगितले की होय, परंतु अशा पुराव्यामध्ये सदर ठिकाणचे स्थान, वाहन क्रमांक इ. असायला पाहिजे, जे शोधण्यासाठी सोपे जाईल. त्यांनी पुढे सांगितले की माननीय राष्ट्रीय हरित लवादाचे काही निर्णय दिले आहेत, पर्यावरणाचे नुकसान होईल ते गावाचे नुकसान असेल आणि म्हणुन शासन निर्णया मध्ये गावक-यांची समिती आहे, समितीने या बाबतीत योग्य लक्ष दिले पाहिजे आणि सर्व अटींची पुर्तता होते का हे पहायला पाहिजे आणि सर्व संबंधिताकडून सहकार्य अपेक्षित आहे. श्री. सुशिल कुमार राठोड यांनी नागरिकांना प्रश्न विचारण्यापुर्वी स्वत:चे नाव व गावाचे नाव सांगावे, अशी विनंती केली, श्री. अहिरराव यांनी विचारले की वाळू उत्खनानासाठी किती फुट खोली आवश्यक आहे. श्री. किशोर घोडके, जिल्हा खनिकर्म अधिकारी, ओरंगाबाद (प्रकल्प प्रवर्तक) यांनी सांगितले की सर्वेक्षणा नुसार प्रत्येक वाळू घाटाची खोली प्रत्येक ग्रामपंचायत क्षेत्रात वेगवेगळी असते, त्यावर डॉ. गव्हाणे यांनी जास्तीत जास्त खोली सांगावे असे त्यांना विचारले, त्यावर श्री. किशोर घोडके, प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की देवळी मध्ये वाळू घाटाची एकुण खोली ३ मिटर आहे, तर वाळू उत्खननासाठी मंजुर खोली १ मिटर आहे.

- **श्री. जनार्दन काकडे, झोलगांव, ता. वैजापुर, जि. औरंगाबाद** यांनी सांगितले की त्यांचा वाळू घाट फक्त शासकीय कामासाठीच विचारात घेण्यात यावा आणि तो खाजगी कंत्राटदाराला देउ नये कारण मागच्या वेळी ६८०० ब्रास वाळूसाठी लिलाव झाला होता आणि वाळू उत्खनन ३०००० ब्रास पेक्षा जास्त केले गेले आणि या बाबतीत त्यांनी अनेक अर्ज तसेच तक्रारी दिल्या, परंतु काहीही झाले नाही, म्हणुन या वेळेस त्यांचे वाळू घाट शासकीय कामासाठी दयावे अशी त्यांनी विनंती केली कारण त्यांच्या भागात सिमेंट बंधा-यांचे शासकीय कामे मंजुर झालेली आहेत, त्यावर डॉ. गव्हाणे यांनी सांगितले की शासकीय कामासाठी शासकीय यंत्रणेकडून जी काय मागणी असेल, त्या वेळेस वाळू घाट ठेवला/प्रस्तावित केला जातो आणि जर एखादा घाट शासकीय कामासाठी ठेवला आणि अशा घाटतुन जर संपुर्ण वाळू उचलण्याची गरज नसेल तर त्यामुळे विनाकारण महसुलाचे नुकसान होते, परंतु श्री. काकडे यांनी सांगितले की भोकरगाव जे त्यांच्या भागा अंतर्गत येते त्याचा समावेशासह त्यांच्या भागात पाच सिंमेट बंधारे मंजुर झालेले आहेत, त्यावर डॉ. गव्हाणे यांनी सांगितले की वाळू घाटाचा प्रस्ताव शासकीय विभाग, जी यंत्रणा बांधकाम करेल त्यांच्या तर्फे पाहिजे, आणि तो श्री काकडे यांच्याकडून अपेक्षित नाही, परंतु एक सुचना म्हणुन ते रास्त आहे आणि अशा कामासाठी जिल्हा परिषद पंचायत समिती, जल संधारण विभाग इ. यांच्या तर्फे जर प्रस्ताव प्राप्त झाला तर त्याबाबत जिल्हाधिकारी विचार करतील.

- **श्री. जे. जे. अहिरराव, ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत देवगांव (रंगारी), ता. कन्नड, जि. औरंगाबाद** यांना वाळू लिलावाच्या रक्कमेमध्ये मध्ये ग्रामपंचायतीच्या हिश्या विषयी जाणुन घ्यायचे होते, त्यावर श्री किशोर घोडके, प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की वाळू लिलावाच्या रक्कमे मध्ये

ग्रामपंचायतीचा हिस्सा वाळू लिलावाच्या किमतीच्या १० टक्के असेल आणि सदर रक्कम शासन निर्णयानुसार विकास कामे, पर्यावरण (पुरक) कामासाठी वापरल्या जाउ शकेल, डॉ. गव्हाणे यांनी देखील विकास कामासाठी त्यांना सदर जी आर पहाण्यासाठी सुचविले. श्री. आहिरराव यांनी त्यांच्या ग्रामपंचायतीतील सन-२०१८ मध्ये झालेल्या लिलावाची रक्कम न मिळाल्या विषयी विचारल्या नंतर डॉ. गव्हाणे यांनी सांगितले की ते मिळतील आणि शासन कोणाचेही पैसे ठेवत नाही.

सर्व सार्वजनिक सहभागींचे प्रश्न संपलेले आहेत असे विचारात घेवुन श्री. सुशिलकुमार राठोड, उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, औरंगाबाद तथा पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समितीचे समन्वयक यांनी डॉ. राजेश औटी यांना आभार प्रर्दशनासाठी विनंती केली. त्यानंतर डॉ. राजेश औटी, क्षेत्र अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, औरंगाबाद यांनी पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी समितीचे अध्यक्ष यांच्या परवानगीने सर्व सार्वजनिक सहभागींचे आभार मानुन सदर जाहीर लोक सुनावणी संपन्न झाल्याचे जाहीर केले.

जिल्हा खनिकर्म अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांनी दि. ३०/११/२०२२ च्या पत्रान्वये कळविले की श्री. रामभाऊ उत्तम चौधरी, सरपंच ग्रुप ग्रामपंचायत, लाखणी/जांबखेडा, ता. वैजापुर, जि. औरंगाबाद यांनी त्यांचा मौजे लाखणी, ता. वैजापूर येथील वाळू घाटाचा लिलाव न करण्याबाबतचा आक्षेप अर्ज जिल्हा खनिकर्म कार्यालय, औरंगाबाद यांचेकडे दि. ३०/११/२०२२ रोजी वाळु घाटाची जाहीर लोक सुनावणी संपल्यानंतर येण्यास उशिरा झाल्यामुळे सादर केलेला आहे, आणि सदर आक्षेप अर्जाची प्रत प्रादेशिक कार्याल, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, ओरंगाबाद यांचेकडे जाहीर लोक सुनावणीचया इतिवृत्ता मध्ये नोंद घेण्यासाठी पाठविली आहे. सदर दि. ३०/११/२०२२ च्या पत्राची प्रत श्री. रामभाउ उत्तम चौधरी, सरपंच, ग्रुप ग्रामपंचायत, लाखणी/जांबखेड, ता. वैजापुर, जि. औरंगाबाद यांच्या आक्षेप अर्जासह (संलग्नकासह) येथे जोडली आहे.

शेवटी अध्यक्षांचे आभार मानुन सदर जाहीर लोकसुनावणी संपन्न झाली.

(सुशिलकुमार राठोड)
उप-प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, औरंगाबाद
तथा पर्यावरण विषयक जाहीर
लोक सुनावणी समितीचे समन्वयक

(डॉ. अनंत गव्हाणे)
अतिरिक्त जिल्हाधिकारी, औरंगाबाद
तथा पर्यावरण विषयक जाहीर लोक
सुनावणी समितीचे अध्यक्ष